# ५९ प्राचीन सुंदर गोष्टी

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय का.वा.
दा. क्र. ९२



BVBK-0400012

॥ श्री ॥

बा. वि.
नों. क्र. १२

# प्राचीन सुंदर गोष्टी

लेखक

म. स. भावे

म. गं. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
... विभाग.
दा. क्र. ...१२... शिलांक .......
विषय... बा. वा. ... क्र. ...........

एक रुपया

BVBK-0400012

ग्रंथ प्रकाशक
व
ग्रंथ विक्रेते

श्रीराम प्रकाशन ... २१६,
...वार पेठ,
पुणे ३०.

# आमचे प्रकाशित बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| जादूचे जहाज | जादूची आंगठी | जादूगार फकीर |
| दोन राजपुत्र | जादूची तलवार | जादूचा भोपळा |
| तीन राजपुत्र | राक्षसाची पेटी | जादूचा राजवाडा |
| लबाड जादूगार | संत एकनाथ | लाल चोर |
| जादूचा मासा | जादूचा करंडा | जादूचे पान |
| एक राक्षस | दोन राक्षस | महावळी |
| जादूचे सरोवर | जादूचे कबूतर | जादूची खुर्ची |
| अलिबाबा व चाळीस चोर | राजा हरिश्चंद्र | महर्षि आस्तिक |
| सोनेरी केसांचा राक्षस | काळा चोर | जादूची पेटी |
| धाडसी राजपुत्र | राक्षसांचा राजा | राजपुत्र खुदादाद |
| हिमराक्षस | बुटका जादूगार | जादूचा अंगरखा |
| जादूगार राजा १ ला | संत नामदेव | भीम |
| जादूगार राजा २ रा | नल-दमयंती | श्रीदत्तकथा |
| जादूगार परी | सात राक्षस | राजा विश्वामित्र |
| सात राजपुत्र | जादूचा आरसा | सुकन्या |
| जादूगार चेटकीण | बारा राजपुत्र | राजा अंबरीष |
| भीष्म | जादूचे स्वप्न | तीन जादूगार |
| संत रामदास | श्रीरामकृष्ण परमहंस | झाशीची राणी |
| संतकथा | प्राचीन सुंदर गोष्टी | गोपालकृष्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| अस्वल राजपुत्र | १–२५ | अरबी अद्भुत कथा | २—० |
| भाग्यविधाता अणू | १–७५ | आधुनिक भारत महर्षि | २—० |
| परीकथा | २–०० | काळा जादूगार | २—० |
| शूर शिलेदार | २–०० | भारतीय वैज्ञानिक | ३—० |
| वेताळ पंचविशी | २–०० | राजकन्या सौंदर्यवती | ३—० |
| अमृतधारा | २–०० | राजपुत्र हेमंत | ३—० |
| दिग्विजय | २–०० | दर्यावर्दी सिंदबाद | २—० |

सर्वाधिकार लेखकाधीन.

प्रकाशक :
**सौ. शैलजा म. भावे**
२१६, शनिवार पेठ,
पुणे ३०.

विजयादशमी
२१-१०-१९७७

मुद्रक :
**सौ. आशा प्र. बापट**
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

## : १ : जय-विजय

कर्दम नावाचे एक ऋषी होते. त्यांना दोन मुलगे होते. जय अन् विजय अशी होती त्यांची नावे. दोघेही हुशार आणि प्रेमळ होते. कधी भांडायचे नाहीत की तंडायचे नाहीत. सदैव ते मिळून मिसळून राहायचे, गोडी-गुलाबीने वागायचे. राम-लक्ष्मणच होते जणू काही.

जय आणि विजय दोघेही विष्णुभक्त होते. विष्णूची भक्ती करण्यात त्यांना अपार आनंद होई. अगदी मनोभावाने ते विष्णूची पूजा करीत. विष्णूची पूजा अन् ध्यान करण्यातच ते सदैव गुंग असत.

त्यांच्या भक्तीने भगवान विष्णू प्रसन्न झाले. त्यांनी जय-विजयांना दर्शन दिले. भगवंतांच्या दर्शनाने जय अन् विजय हर्षले. आपण धन्य झालो असे त्यांना वाटले.

मरुत राजाने एक महायज्ञ करण्याचे ठरविले होते. यज्ञासाठी अनेक ऋषी अन् ब्राह्मण राजाकडे जात होते. त्यांच्याबरोबर जय अन् विजयही राजाकडे गेले.

जय-विजयांना पाहून राजाला आनंद झाला. त्याने त्यांची पूजा केली. त्यांचे स्वागत केले. यज्ञास मदत करावी म्हणून राजाने त्यांना विनविले.

जय-विजय संतोषले. त्यांनी राजाच्या विनंतीला मान दिला. मग राजाने जयाला केले ब्रह्मा. अन् विजय लहान, म्हणून त्याला केले याजक. शिवाय अनेक ब्राह्मण ऋत्विज होतेच त्यांच्या मदतीला.

यज्ञासाठी राजाने अपार द्रव्य खर्चिले. अनेक दाने दिली. लोकांना संतुष्ट केले. ते सुखावले. त्यांनी राजाला शुभ आशीर्वाद दिले.

यज्ञ संपला. राजा समाधान पावला. मग सर्वांनी अव-भृथ स्नान केले. जय-विजयांनी यज्ञासाठी खूपच कष्ट केले होते. राजाने त्यांना अमाप धन दिले. दोघेही संतुष्ट झाले. राजाला आशीर्वाद देऊन ते आश्रमात निघाले.

आश्रमात आल्यावर त्यांनी भगवंतांची पूजा केली. नंतर ते दोघे एकत्र बसले. यज्ञाच्या गोष्टी बोलू लागले. बोलता बोलता जय म्हणाला, 'विजय ! आपण आपल्याला मिळालेलं द्रव्य एकत्र करू अन् दोघांनी सारखं वाटून घेऊ.'

'जय ! तसं नको ! माझ्या नशिबात होतं तेवढं द्रव्य मला मिळालं– तुझ्या नशिबात होतं तेवढं द्रव्य तुला मिळालं. आता पुन्हा वाटे कसले करावयाचे ?'

'विजय ! चुकतो आहेस तू ! आपण लहानपणापासून प्रेमानं वागलो. ही तुझी अन् ही माझी, म्हणून कोणतीच गोष्ट वेगळी ठेवली नाही. अन् आता हे द्रव्य थोडं कमी-अधिक मिळालं म्हणून का आपण भांडायचं ? म्हणून का आपण आप्पलपोटेपणानं वागायचं ?'

'नाही ! मला माझ्या दैवानं दिलं आहे तेवढं मला पुरे ! कसले वाटे अन् कसलं काय ?'

किती तरी वेळ त्यांचे बोलणे चालले होते. पण त्यांचे काही भांडण मिटेना. शेवटी ते दोघे एकेरीवर आले. जय तर खूपच चिडला. त्याने विजयला शाप दिला, 'विजय ! तू फारच ओढून धरतो आहेस. अगदी नाडतो आहेस तू मला. आणि म्हणूनच लोकांना नाडणारा नक्र (मगर) होशील तू.'

तो शाप ऐकून विजयही चिडला. 'जय ! तू मला शाप दिलास ! फारच माजला आहेस तू. मदानं माजलेला हत्ती होशील तू.'

झाले ! एकमेकांवर जिवापलीकडे प्रेम करणारे भाऊ. एकाच्या दुखले की दुसऱ्याच्या डोळ्यांना पाणी येई. पण ते भांडले अन् त्यांनी एकमेकांना शाप दिला.

थोडा वेळ झाला, अन् मग दोघांच्याही लक्षात आपली चूक आली. त्यांना पश्चात्ताप झाला. 'काय हे करून बसलो आपण ?' ते म्हणू लागले.

जय-विजयांना पाहून राजाला आनंद झाला. त्याने त्यांची पूजा केली. त्यांचे स्वागत केले. यज्ञास मदत करावी म्हणून राजाने त्यांना विनविले.

जय-विजय संतोषले. त्यांनी राजाच्या विनंतीला मान दिला. मग राजाने जयाला केले ब्रह्मा. अन् विजय लहान, म्हणून त्याला केले याजक. शिवाय अनेक ब्राह्मण ऋत्विज होतेच त्यांच्या मदतीला.

यज्ञासाठी राजाने अपार द्रव्य खर्चिले. अनेक दाने दिली. लोकांना संतुष्ट केले. ते सुखावले. त्यांनी राजाला शुभ आशीर्वाद दिले.

यज्ञ संपला. राजा समाधान पावला. मग सर्वांनी अवभृथ स्नान केले. जय-विजयांनी यज्ञासाठी खूपच कष्ट केले होते. राजाने त्यांना अमाप धन दिले. दोघेही संतुष्ट झाले. राजाला आशीर्वाद देऊन ते आश्रमात निघाले.

आश्रमात आल्यावर त्यांनी भगवंतांची पूजा केली. नंतर ते दोघे एकत्र बसले. यज्ञाच्या गोष्टी बोलू लागले. बोलता बोलता जय म्हणाला, 'विजय! आपण आपल्याला मिळालेलं द्रव्य एकत्र करू अन् दोघांनी सारखं वाटून घेऊ.'

'जय! तसं नको! माझ्या नशिबात होतं तेवढं द्रव्य मला मिळालं– तुझ्या नशिबात होतं तेवढं द्रव्य तुला मिळालं. आता पुन्हा वाटे कसले करावयाचे?'

'विजय ! चुकतो आहेस तू ! आपण लहानपणापासून प्रेमानं वागलो. ही तुझी अन् ही माझी, म्हणून कोणतीच गोष्ट वेगळी ठेवली नाही. अन् आता हे द्रव्य थोडं कमी-अधिक मिळालं म्हणून का आपण भांडायचं ? म्हणून का आपण आप्पलपोटेपणानं वागायचं ?'

'नाही ! मला माझ्या दैवानं दिलं आहे तेवढं मला पुरे ! कसले वाटे अन् कसलं काय ?'

किती तरी वेळ त्यांचे बोलणे चालले होते. पण त्यांचे काही भांडण मिटेना. शेवटी ते दोघे एकेरीवर आले. जय तर खूपच चिडला. त्याने विजयला शाप दिला, 'विजय ! तू फारच ओढून धरतो आहेस. अगदी नाडतो आहेस तू मला. आणि म्हणूनच लोकांना नाडणारा नक्र (मगर) होशील तू.'

तो शाप ऐकून विजयही चिडला. 'जय ! तू मला शाप दिलास ! फारच माजला आहेस तू. मदानं माजलेला हत्ती होशील तू.'

झाले ! एकमेकांवर जिवापलीकडे प्रेम करणारे भाऊ. एकाच्या दुखले की दुसऱ्याच्या डोळ्यांना पाणी येई. पण ते भांडले अन् त्यांनी एकमेकांना शाप दिला.

थोडा वेळ झाला, अन् मग दोघांच्याही लक्षात आपली चूक आली. त्यांना पश्चात्ताप झाला. 'काय हे करून बसलो आपण ?' ते म्हणू लागले.

नंतर ते दोघे भाऊ नदीवर गेले. तेथे स्नान करून त्यांनी श्रीहरीची प्रार्थना केली. भगवान विष्णू तेथे प्रकटले. जय-विजय दोघांनी भगवंताच्या पायावर लोटांगण घातले. ते म्हणू लागले,

'भगवन ! आम्ही चूक केली. आम्ही संतापाच्या भरात भान न राहून एकमेकांना शाप दिला. आता तुम्ही आमची या शापांतून मुक्तता करा. आम्हाला आमच्या मूर्खपणातून वाचवा.'

भगवान हसले. 'मी तुमची आत्तादेखील शापांतून मुक्तता करू शकेन. पण तसं करणं योग्य नाही. तुम्ही माझी भक्ती केली आहे. तुमचे बोल खोटे होणार नाहीत. त्यामुळे तुम्ही हत्ती अन् मगर झाल्यावर जेव्हा तुम्ही माझी आठवण कराल तेव्हा तुमची शापांतून मुक्तता करीन. तुम्हाला वैकुंठाला घेऊन जाईन.' इतके बोलून भगवान अंतर्धान पावले.


शापाप्रमाणे विजय मगर झाला. तो गंडकी नदीमध्ये राहू लागला. जय हत्ती झाला. तो चित्रकूट पर्वतावर राहू लागला. खूपच दांडगा होता तो. म्हणून त्याला 'गजेंद्र' म्हणत.

त्यानंतर असे बरेच दिवस गेल्यावर एकदा गजेंद्राला तहान लागली. पाणी पिण्यासाठी तो गंडकी नदीवर गेला. काही तरी भक्ष्य मिळेल या आशेने तेथे मगर टपून बसला होता. त्याने गजेंद्राचा पाय पकडला.

गजेंद्राने पाय सोडविण्याची खूप खटपट केली; पण मगर पाय सोडीना आणि बलाढ्य गजेंद्रालाही पाण्यात

खेचून नेऊ शकेना. तिथल्या तेथेच त्यांची कैक महिने झटापट चालली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. सरतेशेवटी गजेंद्र थकला. अन् मगर (नक्र) त्याला खोल पाण्यात खेचून नेऊ लागला.

अगदी जिवावरच बेतले, आता अन्य उपाय नाही हे पाहून गजेंद्राने देवाचा धावा सुरू केला. भगवंताची करुणा भाकली, 'हे प्रभो! हे वैकुंठनायका! आता माझ्या



अंगात त्राण उरलं नाही. अगदी दीन झालो आहे मी. हे दयानिधे ! तू झणी धाव घे. माझी या संकटातून मुक्तता कर.'

गजेंद्राचा तो धावा ऐकून भगवंतांना दया आली. गरुडावर बसून ते त्वरेने गंडकी नदीवर आले. त्यांनी गजेंद्राची सुटका केली. त्याचा उद्धार केला. गजेंद्राचा 'जय' झाला. त्याला गरुडावर घेऊन ते निघाले.

तोच 'हे देवाधिदेवा ! मलाच तेवढे का येथे टाकून जाता ? माझीही तुम्हाला करुणा येऊ दे !' असे उद्‌गार त्यांच्या कानी पडले.

पुन्हा गरुड खाली आला. भगवंतांनी मगराचाही उद्धार केला. मगराचा पुन्हा 'विजय' झाला. त्यालाही गरुडावर घेऊन भगवान निघाले.

'आता तुमची काय इच्छा आहे ?' भगवान जय अन् विजय यांना म्हणाले.

'देवा ! तुझ्या सेवेशिवाय दुसरी कसलीही इच्छा नाही. तुझ्या पायांपासून आम्हाला अंतर देऊ नको.' जय-विजय एकदमच म्हणाले.

'तथास्तु. तुम्ही आजपासून माझ्याच जवळ माझे द्वारपाल म्हणून राहा.' श्री विष्णू म्हणाले,

तेव्हापासून जय-विजय भगवंतांचे द्वारपाल झाले.

★

## : २ : राक्षसांचा राजा वृत्रासुर

बृहस्पती म्हणजे देवांचे गुरुजी. खूपच हुशार अन् विद्वान होते ते. किती तरी मंत्र येत असत त्यांना. सर्व देव त्यांना मान देत. त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान करीत.

एकदा बृहस्पती देवसभेत गेले. गुरुजी आले म्हणून सर्व देव उठून उभे राहिले पण देवेंद्र मात्र उठला नाही. तो तसाच सिंहासनावर बसून राहिला. फार काय, त्याने बृहस्पतींकडे अगदी दुर्लक्षच केले. ते आले आहेत हे जणू काही त्याच्या गावीच नव्हते मुळी.

देवेंद्राला वाटले, आपण देवांचे महाराज. सर्वजण आपल्याला मान देतात. सर्व लोकांना आपला दरारा वाटतो. आपण कशाला करा ऊठबस या बृहस्पतीसाठी ?

देवेंद्राने अपमान केल्यामुळे बृहस्पती रागावले अन् एकदम गुप्त झाले. बृहस्पती रागावले, त्यांचा अपमान झाला याचे देवेंद्राला काही वाटले नाही. तो म्हणाला, ‘ येतील पुन्हा परत. जातात कुठे ?’

ही गोष्ट भगवान विष्णूंना कळली. ते देवेंद्राकडे गेले आणि त्याला म्हणाले, 'देवेंद्रा, काय केलंस हे ?'

'कुठं काय केलं मी ?'

'देवेंद्रा, तू बृहस्पतींचा अपमान केलास. ते रागावून निघून गेले. हे काहीच झालं नाही असं वाटतं तुला ?

गुरुजी गेले. आता आपली धार्मिक कार्यं बंद होतील. आपली शक्ती कमी होईल. आपण दुर्बल होऊ. राक्षस बलवान होतील. आणि मग आपला पराभव होईल.'

आता देवेंद्राच्या लक्षात आपली चूक आली. काही देवांबरोबर तो गुरुजींच्या शोधासाठी निघाला. खूप शोध केला त्याने गुरुजींचा. पण गुरुजींचा काही शोध लागेना.

इकडे राक्षस प्रबळ होऊ लागले. मग ब्रह्मदेवाच्या सल्ल्याने देवेंद्राने विश्वरूपाला आपले गुरुजी केले. विश्वरूपाला 'नारायण कवच' येत होते. त्या नारायण कवचाच्या सामर्थ्याने त्याने देवांचे रक्षण केले.

विश्वरूप देवांचा गुरू झाल्यावर देवांचा यज्ञ सुरू झाला. यज्ञ करताना विश्वरूप मंत्र म्हणे. देवेंद्र आहुत्या देई. पण विश्वरूप होता लबाड. मंत्र म्हणता म्हणता काही मंत्र तो हळूहळू म्हणे. कोणाच्याही लक्षात येणार नाही इतक्या हळू. ते मंत्र असत राक्षसांसाठी. त्या मंत्रांनी राक्षसांचे बळ वाढे.

विश्वरूप ही लबाडी करी. कारण त्याची आई होती राक्षस कुळातली. त्यामुळे विश्वरूपाला राक्षसांविषयी

आपुलकी वाटे. अन् म्हणूनच तो राक्षसांना आहुती देई. त्यांचे बळ वाढावे म्हणून मंत्र म्हणे.

इंद्र फार हुशार होता. विश्वरूपाची लबाडी त्याच्या लक्षात आली. पण तो विश्वरूपाला काही बोलला नाही. कारण त्याला ठाऊक होते की आपण बोललो तर तो सावध होईल.

एक दिवस देवेंद्राचा यज्ञ चालू असता विश्वरूप राक्षसांसाठी मंत्र म्हणू लागला. देवेंद्र पटकन उठला. अन् हाती शस्त्र घेऊन त्याने विश्वरूपाचे शिरच उडविले.

पुन्हा देवाची पंचाईत पडली असती. पण तेवढ्यात बृहस्पतींचा शोध लागला. देवेंद्र स्वतः बृहस्पतींकडे गेला. झालं गेलं विसरून जा, आमच्यावर रागाऊ नका म्हणून त्याने बृहस्पतींची विनवणी केली. मोठ्या आदराने तो त्यांना घेऊन परत आला. त्यांचा सन्मान केला. पुन्हा बृहस्पती देवांचे गुरुजी झाले.

देवेंद्राने विश्वरूपाचा वध केला ही गोष्ट त्याच्या पित्याला –त्वष्ट्याला– कळली. तो रागावला. त्याने देवेंद्राचा नाश करण्याचे ठरविले.

मग देवेंद्राहून बलवान पुत्र निर्माण करण्याची इच्छा धरून त्याने तपश्चर्या सुरू केली. यज्ञ आरंभिला.

त्यांच्या तपाने ब्रह्मदेव प्रसन्न झाले. ‘ त्वष्ट्या, तुझ्या तपाने मी प्रसन्न झालो आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे मी तुला

एक बलवान पुत्र देत आहे. तो देवेंद्राचा पराभव करील.' इतके बोलून ब्रह्मदेव अंतर्धान पावले.

त्याच वेळी यज्ञकुंडातून एक सशक्त अन् धिप्पाड मुलगा बाहेर आला. त्याचे नाव 'वृत्र.'

त्वष्ट्याने वृत्राकडे पाहिले. त्याचे शरीर पिळदार होते. त्याची छाती रुंद होती. बाहू विशाल होते. प्रत्येक अवयव त्याचे सामर्थ्य दाखवीत होता. जणू सामर्थ्य साकारले होते. त्याला पाहून खूपच समाधान वाटले त्वष्ट्याला. त्या समाधानातच तो परत आपल्या उद्योगाला लागला.

वृत्रासुर मोठा झाला. प्रचंड शक्ती त्याच्या अंगात होती. तो देवांचा शत्रू होता. अनेक राक्षस त्याच्या भोवती जमले. त्याच्या आज्ञेत वागू लागले. वृत्रासुर राक्षसांचा अधिपती झाला.

थोड्याच कालात वृत्रासुराने मृत्युलोक जिंकला. त्यानंतर त्याने स्वर्गलोकावर चढाई केली. देवांनी त्याच्याशी लढाई केली. पण वृत्रासुराने देवांचा पराभव केला. देवांना त्याच्यापुढे टिकाव धरणे कठीण होऊन बसले. वृत्राने देवांची राजधानी 'अमरावती' देखील जिंकली.

देवांचा पराभव झाला. देव हरले. त्यांचा वृत्रासुरापुढे मुळी निभावच लागेना. शेवटी त्यांनी ब्रह्मदेवाकडे जाण्याचे ठरविले. कारण ब्रह्मदेवांनीच त्वष्ट्याला वर दिला होता.

मग देव ब्रह्मदेवांकडे गेले. त्यांनी ब्रह्मदेवांना सर्व हकीकत सांगितली.

ब्रह्मदेव म्हणाले, 'तुमचा वृत्रासुराबरोबर टिकाव लागणार नाही. तुमची शस्त्रं नवीन आहेत. ती असावी तेवढी तेजस्वी नाहीत.

पूर्वीची तेजस्वी शस्त्रं तुम्ही दधीची मुनींजवळ ठेवली होती. ती शस्त्रे राक्षसांच्या हाती लागू नयेत म्हणून त्यांनी त्या शस्त्रांचं पाणी केलं अन् मग पिऊन टाकलं ते पाणी.

आता ती शस्त्रे मिळणे शक्य नाही. पण जर दधीची मुनींची हाडे मिळतील तर तुमचे काम होईल. त्या हाडांचे तुम्ही शस्त्रे केलत तर वृत्राचा सहज पराभव होईल.'


देवची दधी ऋषींकडे गेले. ऋषींनी त्यांचे स्वागत केले. देव आपल्याकडे आले म्हणून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, 'देव हो ! काय काम आहे आपले ? मला होण्यासारखे असेल तर मी अवश्य करीन ते.'

पण देवांपैकी कुणी बोलेचना. दधीची ऋषींनी पुनः-पुन्हा विचारले. पण सर्वजण आपले स्तब्ध उभे.

कारण बोलणार कसे कोण ? हाडे मागावयाची म्हणजे प्राणच द्यायला सांगायला हवे ऋषींना. तसे कसे सांगावयाचे ? म्हणूनच कोणाच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

शेवटी कामधेनूला देवांनी पुढे केले. अन् मग तिने सर्व हकीकत ऋषींना सांगितली.

'तुम्हाला हाडेच पाहिजेत ना ? ही घ्या. आत्ता देतो मी तुम्हाला. या शरीराची आशा धरून काय करू ? जगाचे कल्याण होत आहे ना ? मग झालं तर.'



असे म्हणून ऋषींनी समाधी लावली. आपले प्राण अनंतात विलीन केले. ते परमेशाशी एकरूप झाले.

देवांनी दधीची ऋषींच्या हाडांचे एक शस्त्र बनवून ते इंद्राला दिले. ' वज्र ' म्हणतात त्या शस्त्राला.

मग देवांनी युद्धाची तयारी केली. वृत्रासुराबरोबर युद्ध खेळण्याचे त्यांनी ठरविले. वृत्रासुराला ही गोष्ट कळली. त्यानेही सैन्य जमविले. आणि तो देवांवर चालून आला.

युद्ध सुरू झाले. वृत्रासुराने देवांचा खूप नाश केला. मोठा पराक्रम गाजविला त्याने. नंतर तो सरळ इंद्रावर चालून गेला.

इंद्र याच संधीची वाट पाहात होता. त्याने हातात वज्र घेऊन ते वृत्रासुरावर फेकले. अन् दुसऱ्याच क्षणी वृत्रासुराचा निष्प्राण देह खाली कोसळला.

अंधार मावळला. अन् दधीची ऋषींच्या त्यागाने विश्व उजळून निघाले.

★

## : ३ : विष्णुदास आणि चोल राजा

ताम्रपर्णी नदीच्या काठी एक विष्णुमंदिर होते. लहानसेच पण किती सुंदर होते ते मंदिर. अन् मंदिरातली भगवान विष्णूची मूर्ती तर कितीतरी सुरेख होती. अगदी रेखीव अन् छानदार.

फार पवित्र स्थान मानले जात असे ते. किती तरी लोक तेथे येत. भगवंतांचे दर्शन घेत. त्यांची पूजा करीत. मग प्रसन्न अंतःकरणाने घरी जात.

त्या नदीच्या काठी एक नगर होते. 'कांतिनगर' त्याचे नाव. तेथे 'चोल' नावाचा राजा राज्य करीत होता. फारच चांगला अन् धार्मिक राजा होता तो. भगवान विष्णूंवर त्याची फार भक्ती होती.

चोल राजा रोज सकाळी विष्णुमंदिरात जाई. भगवंतांची पूजा करी. मगच आपल्या इतर कामांना सुरुवात करी. भगवान विष्णूची पूजा केल्याशिवाय कोणतेही काम करावयाचे नाही असा त्याचा नियम होता.

एक दिवस तो असाच पूजेसाठी देवालयात आला. त्याने विष्णूची पूजा केली. मग त्याने भगवंतांना निवडक रत्ने वाहिली, सोन्याची फुले वाहिली.

राजाने सुंदर अन् तेजस्वी रत्ने वाहिली होती भगवंतांना. त्या रत्नांच्या तेजात भगवंतांची सुरेख मूर्ती छानच शोभून दिसत होती.

राजाने मूर्तीकडे पाहिले. त्याला स्वतःचा खूपच अभिमान वाटला. लोक येत अन् चकितच होत ती रत्नपूजा पाहून. देवाला ते नमस्कार करीत, देवाचे दर्शन घेत अन् रत्नपूजा केल्याबद्दल राजाचे कौतुक करीत. राजाला वाटले, आपल्यासारखा दुसरा भक्त असणारच नाही मुळी.

असा विचार त्याच्या मनात आला अन् त्याच वेळी त्याने विष्णुमूर्तीकडे पाहिले. मूर्ती हसल्याचा त्याला संशय आला. त्याने पुन्हा मूर्तीकडे पाहिले. छे ! मूर्ती हसत नव्हती. राजाला वाटले, आपल्याला भासच झाला असावा. काही वेळ तेथे थांबून राजा परत फिरला.

राजा जाऊन थोडा वेळ झाला. एक ब्राह्मण त्या मंदिरात आला. त्याला लोक म्हणत ' विष्णुदास. ' पण ते काही त्याचे खरे नाव नव्हते. त्याचे खरे नाव दुसरेच होते. पण तो सदैव विष्णूची भक्ती करी, म्हणून लोक त्याला ' विष्णुदास ' म्हणत.

विष्णुदास भगवंतांच्या मूर्तीजवळ गेला. भगवंतांना अर्पिलेली रत्ने पाहून त्यालाही कौतुक वाटले. किंचित काल तो मूर्तीकडे पाह्यातच राहिला.

जरा वेळाने त्याने देवाची पूजा करण्यास आरंभ केला. मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. मंत्र म्हणता म्हणता एकीकडे तो देवाला तुलसीदले वाहू लागला. थोड्याच वेळात राजाने वाहिलेली सर्व रत्ने झाकून गेली तुलसीदलांनी.

सायंकाळी राजा पुन्हा विष्णुमंदिरात आला. आपण केलेली रत्नपूजा त्याला पाहावयाची होती. लोक काय म्हणतात आपल्याविषयी ते ऐकावयाचे होते. तो विष्णु-मूर्तीकडे पाहू लागला. आश्चर्यच वाटले त्याला. त्याला रागही आला. त्याने केलेली पूजा झाकळली होती. त्याने अर्पिलेली रत्ने तुळशींनी आच्छादली होती.

तो खूपच चिडला. त्याने आजूबाजूला पाहिले; पण तुळशी कोणी वाहिल्या, त्याची पूजा कोणी झाकली हे काही त्याला कळेना. मग करणार काय ? तो चडफडत राजवाड्यात परत गेला.

नेहमीप्रमाणे दुसऱ्या दिवशी राजा विष्णुमंदिरात आला. आजही त्याने देवाची रत्नांनी पूजा केली. पण आज तो राजवाड्यात गेला नाही. तेथेच बसून राहिला.

काही वेळाने विष्णुदास तेथे आला. मंत्र म्हणत त्याने ती पूजा आरंभिली. मंत्र म्हणता म्हणता एकीकडे तो

देवाला तुळशीपत्रे वाहू लागला. राजाने वाहिलेली रत्ने एकामागून एक झाकली जाऊ लागली.

राजाने ओळखलें की यानेच आपली कालची पूजा झाकली. तो डोळे वटारून त्याच्याकडे पाहू लागला. त्याला आपला राग आवरेना. तो चटकन म्हणाला, ' अरे ! तू काय करतो आहेस हे ?'

पण विष्णुदासाचे तिकडे मुळी लक्षच नव्हते. तो आपला मंत्र म्हणण्यात आणि देवपूजा करण्यातच गुंग होता.

आता राजाच्या रागाचा पारा खूपच चढला. तो विष्णुदासाजवळ जाऊन त्याला म्हणाला, पण म्हणाला कसला, ओरडलाच तो त्याच्यावर, ' अहो ! काय चालवलं आहे तुम्ही हे ?'

' राजा ! रागावतोस का ? पूजा करतो आहे मी तुळशींनी देवाची.'

' ते दिसलं मला. पण त्या तुळशींच्या भाऱ्याखाली मी केलेली रत्न-पूजा झाकली जात आहे ते तुम्हीच पाहा जरा.'

' महाराजा, आम्ही गरीब माणसं. पूजेसाठी आम्ही रत्नं कोठून आणावी ? आम्हाला रत्नं मिळत नाहीत म्हणून तुळशी वाहतो देवाला आम्ही.'

' पण सांगतोच कोण तुम्हा भिकाऱ्यांना रत्ने वाहा म्हणून ? मी सांगतो आहे, की रत्नांनी केलेली पूजा झाकून टाकू नका. समजलं ?'

'राजा ! देवाची भक्तिभावानं पूजा केली म्हणजे झालं. मग रत्नांनी केली वा तुळशीनी केली तरी देवाला तो सारखीच.'

'म्हणे रत्नांनी अन् तुळशींनी केलेली पूजा सारखीच ! आणि मलाच उपदेश करतो आहे भक्तिभावाचा. कंगाल नाही तर !'

'राजा ! भगवान रत्नपूजेनंच प्रसन्न होते तर आम्हा गरिबांना देवाची पूजा करायलाच नको होती. पण तसं नाही. देव भावाचा भुकेला आहे. खऱ्या भक्तीनं देवाला एक तुळशीपत्र वाहिलं तरी चालतं; पण लोकांना दाखवण्यासाठी जरी रत्नं वाहिली तरी त्याचा काही उपयोग नाही. त्या खोट्या, वरपांगी भक्तीनं देवाला संतोष होत नाही.'

'अरे वा ! माझी भक्ती खोटी ? आणि तुझी भक्ती खरी नव्हे का ? खूपच अभिमान दिसतो आहे तुला तुझ्या भक्तीचा अन् भावाचा ! कधी दानधर्म केला आहेस का तू ? म्हणे भक्ती !

'पण ते असो ! आपण कोणाची भक्ती श्रेष्ठ ते ठरवूयाच. आपण दोघेही विष्णुपूजा करतो ना ? मग ज्याला भगवान पहिल्यांदा दर्शन देतील त्याची भक्ती श्रेष्ठ, तो श्रेष्ठ. आहे कबूल ?'

'हो, आहे कबूल !' विष्णुदासानेही जोरात सांगितले. त्यांची पैज ठरली. मग दोघेही आपआपल्या मार्गाने निघून गेले.

राजवाड्यात परत जाताना राजा विचार करीत होता, काय वेडा आहे हा ब्राह्मण ! त्याच्याजवळ ना धन ना दौलत ! अन् आपल्याजवळ कशाचीच उणीव नाही. पैसा आहे, नोकर आहेत, चाकर आहेत, कसलीच कमतरता नाही आपल्याला.

आपण आता ऋषींना बोलावू. एक मोठा यज्ञ करू. मग भगवान आपल्यावर प्रसन्न होतील. अन् तो वेडा बसेल तुळशींनी पूजा करीत. पण यज्ञ केल्यानं भगवंताचं आपल्याला अगोदर दर्शन होईल. अन् मग अशी फजिती होईल त्या कंगाल विष्णुदासाची ! अगदी छान जिरेल.

याप्रमाणे विचार करीत राजा राजवाड्यात आला. राजवाड्यात येताच त्याने मुग्दल मुनींना बोलाविले. मुग्दल मुनी आले. त्यांच्या विचाराने राजाने एक मोठा 'विष्णुयाग' सुरू केला.

इकडे विष्णुदास घरी गेला. त्याने यज्ञाचा वगैरे काही विचारदेखील केला नाही. कारण करणारच मुळी कसा यज्ञ ? त्याच्याजवळ ना पैसा ना काही. तो देवाची भक्ति-भावाने पूजा करी. देवाला नैवेद्य अर्पण करी. मग तो आपले जेवण उरकी. अन् उरलेला सर्व वेळ देवाचे नाम-स्मरण करण्यात घालवी.

एक दिवस विष्णुदासाने देवाची पूजा केली. नित्या-प्रमाणे पूजा झाल्यावर तो भगवंताचे ध्यान करीत बसला. काही वेळाने त्याचे ध्यान संपले. त्याने डोळे उघडले आणि नैवेद्याच्या थाळीकडे पाहिले. तो काय— नैवेद्याची थाळी रिकामी !

तो चकितच झाला. तो बावरला. तो भांबावला. त्याने नैवेद्यासाठी इकडे तिकडे पाहिले. पण नैवेद्य तेथे नव्हताच मुळी, तर तो मिळणार कुठून त्याला? आता कसे करावे? देवाला उपवास घडणार आपल्यामुळे. देवाला नैवेद्य दाखविता येणार नाही. त्याला वाईट वाटले.

त्याने भगवंतांची प्रार्थना केली, ' हे भगवन ! हे प्रभो ! आज तुम्हाला उपवास घडणार. मला क्षमा करा.'

विष्णुदासही त्या दिवशी उपाशीच राहिला. कारण भगवान उपाशी असताना स्वतः जेवण करण्याची कल्पना सुद्धा त्याला सुचणे शक्य नव्हते.

दुसऱ्या दिवशीही हाच प्रकार घडला. अन् तिसऱ्या दिवशीही त्याच गोष्टीची पुनरावृत्ती झाली. सतत सात दिवस हाच प्रकार चालू होता. सतत सात दिवस विष्णुदासाला उपास घडत होता. पण विष्णुदासाच्या चेहऱ्यावरील हसू लोपले नव्हते. तो कातावला नव्हता की संतापला नव्हता. त्याच्या देवपूजेतही खंड पडला नव्हता. भगवंतांचे नामस्मरण करीत मोठ्या आनंदाने तो आपला वेळ घालवीत होता.

आठव्या दिवशी त्याने देवाची पूजा केली. नंतर देवाचे ध्यान केले. ध्यान आटोपल्यावर त्याने डोळे उघडून पाहिले. नैवेद्याच्या थाळीतील नैवेद्य-पोळी एक भिकारी पळवून नेत होता.

विष्णुदासाने त्याच्याकडे पाहिले. अगदी हडकुळा होता तो. हाडेन् हाडे दिसत होती त्याची, अन् अंगावर मांस तर कुठेच नव्हते.

विष्णुदासाला त्याची दया आली. त्याने थाळीकडे पाहिले तो भिकाऱ्याने नुसती पोळीच नेली होती अन् तूप-साखरेची वाटी तशीच होती. आता तो भिकारी नुसतीच पोळी खाणार या विचाराने त्याला वाईट वाटले. स्वतः उपाशी असल्याची जाणीवदेखील त्याला झाली नाही.

'अरे थांब ! अरे थांब !' असे ओरडत विष्णुदास त्या भिकाऱ्याच्या मागे धावू लागला.




तो आपल्याला पकडण्यासाठी येतो आहे असे वाटून

भिकारी जोरात पळू लागला. पण पळता पळता त्याला ठेच लागली. तो खाली पडला. त्याची शुद्ध गेली. तो बेशुद्ध झाला.

विष्णुदास त्याच्याजवळ गेला. त्याने तुपाची वाटी बाजूला ठेवली आणि अंगावरील उपरण्याने तो त्याला वारा घालू लागला. काही वेळाने भिकाऱ्याने डोळे उघडले. विष्णुदासाला आनंद झाला. तुपाची वाटी घेण्यासाठी त्याने मान वळविली. अन् पुन्हा समोर बघतो तो काय– तो भिकारी तेथे नव्हता. श्यामसुंदर भगवान विष्णू त्याच्यासमोर उभे होते.

विष्णुदास चकितच झाला. भगवंतांना प्रणाम करण्याचे त्याला भान राहिले नाही. डोळ्याचे पातेही न हलवता तो भगवंतांकडे पाहातच राहिला. भगवान हसले. त्यांनी त्याला आपल्या विमानात बसविले.

राजा विष्णुयाग करीत होता. आकाशातून जाणारे विमान त्याने पाहिले. त्याने विचारणा केली, ' कोणाचे आहे हे विमान ? कसले आहे हे विमान ?'

त्याला कळले की विष्णुदासाला भगवंतांनी दर्शन दिले. अन् तोच त्या विमानातून चालला आहे.

आता राजाचा गर्व गळाला. विष्णुदासाची निंदा केल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. विष्णुदासाची भक्ती श्रेष्ठ हे त्याला पटले. त्याचा सर्व अभिमान नाहीसा

झाला. भगवान धनाचे भुकेले नाहीत हे त्याला कळले. भगवान भक्तीला भुलतात. शुद्ध मनाने केलेल्या पूजेनेच ते संतुष्ट होतात याची त्याला जाणीव झाली.

मुग्दल ऋषींकडे वळून तो म्हणाला, ‘ पुरे झाला हा याग. आता काय उपयोग आहे या यागाचा ? विष्णुदासच माझ्याहून श्रेष्ठ आहे. त्याने पैज जिंकली. मी पैज हरलो.’

नंतर तो यज्ञकुंडाजवळ येऊन उभा राहिला अन् हात जोडून म्हणाला, ‘ हे भगवन ! मी चुकलो. मला वाटले की पैशाने तुम्हाला वश करता येईल. माझ्या रत्न-पूजेने तुम्ही प्रसन्न व्हाल. पण आता माझे डोळे उघडले. मन, वाणी अन् शरीर यांच्या द्वारा साधणारी अचल भक्ती मला द्या. ’ असे बोलून राजाने यज्ञकुंडात उडी मारली.

सरसर विमान खाली आले. भगवान विष्णूंनी राजाला अलगद झेलले. त्याला विमानात घेतले. अन् ते विमान दिसेनासे झाले.

★

: ४ :

# नाभाग

नाभागाने आश्रमात प्रवेश केल्याला एक तप होऊन गेले होते. नाभागाचा विद्याभ्यास पूर्ण झाला होता. गुरुजींची सेवा करून अन् अभ्यास करून त्याने ज्ञान संपादिले होते. सर्व शास्त्रांत तो पारंगत झाला होता. सर्व वेद त्याने अभ्यासिले होते. गुरुदेवांनी घेतलेल्या परीक्षेत तो उत्तीर्ण झाला होता.

त्याने गुरुजींना वंदन केले. घरी परत जाण्यासाठी त्यांची अनुज्ञा मागितली.

गुरुजींचा कंठ भरून आला. 'नाभागा, तुझे आश्रमीय जीवन संपले. आता व्यवहारी जीवन सुरू होईल. नाना प्रलोभने तुला भुलवतील. पण तू धर्माने वाग. खरे बोल. तू यशस्वी होशील. देव तुझे कल्याण करील.'

गुरुजींचा आशीर्वाद घेऊन नाभागाने आश्रम सोडला. तो घराची वाट चालू लागला. वाट चालता चालता घरचे चित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. त्याचे वडील अन् त्याचे भाऊ त्याला डोळ्यांसमोर दिसू लागले.

झपझप मार्ग कापीत नाभाग घरी आला. आज सोळा वर्षांनी तो घरी परत आला होता. त्याने घरात प्रवेश केला अन् धक्काच बसला त्याला.

त्याचे भाऊ– लहानपणी त्याच्यावर जिवापलीकडे प्रेम करणारे त्याचे भाऊ आज त्याच्याशी बोलायलादेखील कबूल नव्हते. तो आला म्हणून त्यांना आनंद झाला नाही. त्यांनी त्याची विचारपूस केली नाही. आपली तोंडे मात्र वाकडी केली त्यांनी. नाभागाचे वडील तर आजारी पडले होते. नाभाग त्यांच्याजवळ गेला. त्यांना आनंद झाला. नाभागाला त्यांनी आपल्याजवळ बसवून घेतले. त्याच्या पाठीवरून त्यांनी प्रेमाने हात फिरवला. खूप खूप बरे वाटले नाभागाला. किती वेळ बोलत होता तो त्यांच्याशी.

आपल्याशी भाऊ का बोलले नाहीत हे नाभागाला आता कळले. तो आश्रमात असताना ते वडिलांशी भांडले, आपापसात भांडले, अन् त्यांनी आपसांत सर्व संपत्ती वाटून घेतली. नाभागाच्या वाट्याला काहीदेखील ठेवले नाही.

आता नाभाग आला. तो आपल्याजवळ भांडेल, आपल्या संपत्तीतला काही भाग त्याला द्यावा लागेल म्हणून त्यांनी तोंडे वाकडी केली.

पण नाभाग वडिलांना म्हणाला, ‘ बाबा, दादाने अन् भाऊने मला काहीही ठेवले नाही तरी चालेल. मी काही त्यांच्याशी भांडणार नाही. मला संपत्तीही नको अन् भांडणही नको. तुमचा आशीर्वाद असला अन् भगवंताची

मजवर कृपा असली म्हणजे झाले. मग गुरुजींनी दिलेल्या विद्येच्या सामर्थ्याने मी वाटेल तेवढे धन मिळवीन.'

नाभागाचे बोलणे ऐकून त्याच्या वडिलांचा ऊर भरून आला. असा गुणी मुलगा मिळाल्याबद्दल धन्यता वाटली. 'शाबास! नाभागा, फार छान बोललास! देवाची तुझ्यावर कृपा आहे. धन मिळविण्याची एक नामी संधी आली आहे तुला.

'शेजारच्या तपोवनात एक मोठा यज्ञ चालला आहे. मोठे मोठे पंडित तेथे आहेत ऋत्विज म्हणून. पण यज्ञाच्या सहाव्या दिवसाच्या कर्माविषयी त्यांना संशय आहे. तू तेथे जा. त्यांचा संशय दूर कर. तुला पुष्कळ द्रव्य मिळेल.'

नाभागाला आनंद वाटला. स्वतःच्या कर्तबगारीने धन मिळविण्याची संधी त्याला आली होती. स्वतः संपादिलेल्या विद्येची चमक त्याला दाखविता येणार होती.

नाभाग यज्ञमंडपात पोहोचला. त्या नवागत युवकाचे सर्वांनी स्वागत केले. मग नाभागाने त्यांचा संशय दूर केला. सर्व कर्म त्याने त्यांना शास्त्राधारे सांगितले.

ऋषी आनंदले. त्यांनी नाभागाची वाहवा केली. त्याला शाबास म्हटले.

यज्ञ संपला. सर्वांनी अवभृथ स्नान केले अन् नंतर उरलेले यज्ञद्रव्य मोठ्या सन्मानाने नाभागाला दिले.

ते द्रव्य घेऊन नाभाग घरी परत चालला होता. गोड विचार त्याच्या मनात घोळत होते. गोड स्वप्ने त्याच्या दृष्टीसमोर तरळत होती. अन् त्या गुंगीत तो घराची वाट चालत होता.

'ए ! कुठे चालला आहेस तू ? अन् हे कसले ओझे आहे तुझ्या डोक्यावर ?'



ह्या शब्दांनी तो सावध झाला. त्याने समोर पाहिले.

एक काळाकभिन्न भिल्ल त्याची वाट अडवून उभा होता. आडदांड अन् क्रूर दिसत होता तो. पण नाभाग त्याला भ्याला नाही.

' का रे बाबा ? मी माझ्या घरी जातो आहे. मला अडवून लुटण्याचा विचार आहे की काय तुझा ? पण सांभाळ हं. तुला जड जाईल ते काम.'

' पण तुझ्या डोक्यावर काय आहे ते नाही सांगितलंस तू.'

मला ऋषींनी दिलेलं द्रव्य आहे. स्वतःच्या श्रमांनी मी ते मिळवून आणलं आहे. माझं आहे ते द्रव्य आता.'

' नाही ! ते द्रव्य तुझं नाही, ते द्रव्य माझं आहे. अन् तू पळवून नेत आहेस ते.'

' ह्या द्रव्यावर तुझा काहीच अधिकार नाही. मी यज्ञात ऋषींना मंत्र सांगितले. त्यांना साह्य केलं. अन् म्हणून यज्ञात शिल्लक उरलेलं धन त्यांनी मला दिलं.'

' यज्ञात उरलेलं धन आहे ना हे ? म्हणूनच माझा त्याच्यावर अधिकार आहे. तू हे धन येथे ठेव अन् निमूटपणे घरी जा कसा.'

पण नाभाग त्याचे कसे ऐकणार ? मग झाले दोघांचे भांडण सुरू. कोणीच आपला हेका सोडीना. शेवटी तो भिल्ल म्हणाला, ' असं बघ ! तू हे द्रव्य येथे ठेव. घरी जा अन् तुझ्या वडिलांना विचारून ये. ते देतील तो निकाल मला मान्य आहे.'

नाभागाने त्याच्याकडे विचित्र नजरेने पाहिले. जणू काही

म्हणत होता, 'वा ! म्हणजे छानच. मी निघून गेलो हे द्रव्य पसार करायला तुला चांगलीच संधी मिळेल.' पण त्याचे विचार त्या भिल्लाने ओळखले. तो म्हणाला, 'नाभागा ! तू बिलकूल घाबरू नको. माझ्यावर विश्वास ठेव. तू येईपर्यंत मी हे द्रव्य सांभाळतो. द्रव्य माझेच आहे. मग मला पळवून नेण्याची काय जरूर ?'

त्याच्या सांगण्याप्रमाणे नाभाग घरी आला. सगळा वृत्तान्त त्याने वडिलांना सांगितला.

नाभागाच्या वडिलांनी जरा वेळ विचार केला. अन् मग ते म्हणाले, 'बरोबर आहे त्या भिल्लाचं म्हणणं. शंकर असला पाहिजे तो. यज्ञात अवशिष्ट राहतं ते सर्व शंकराचं असतं. त्याचाच अधिकार आहे त्या द्रव्यावर.'

नाभाग परत आला. भिल्ल त्याची वाटच पाहात होता.

'काय म्हणाले तुझे वडील ? कुणाचं आहे हे द्रव्य ?'

'ह्या द्रव्यावर तुझाच अधिकार आहे. हे द्रव्य तुझं आहे. मी तुझ्याशी भांडलो त्याबद्दल मला क्षमा कर.'

असे म्हणता म्हणता नाभागाने हात जोडले. चूक झाल्याच्या जाणिवेने त्याची मान खाली; गेली अन् नंतर तो मान वर करून पाहतो तो भगवान शंकर त्याच्यासमोर उभे होते.

'नाभागा, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. मी तुझी परीक्षा घेतली. पण तू अन् तुझे वडील, दोघंही खरं बोललात. मला आनंद वाटला.

' ह्या द्रव्यासाठी लोक खोटं बोलतात, मारामारी करतात. मोठ्या विद्वान अन् ज्ञानी लोकांनाही याचा मोह तोडवत नाही. पण तुम्ही मोह दूर सारलात. जा, हे द्रव्य तू खुशाल घेऊन जा— अन् याचा सदुपयोग कर.' इतके बोलून कैलासनाथ अंतर्धान पावले.

नाभाग परत घरी चालला. त्याला द्रव्याचे ओझे वाटत नव्हते. अन् ते द्रव्य मिळूनही जेवढा आनंद त्याला वाटला नाही, तेवढा अभिमान भगवान शंकराच्या आशीर्वादानं लोभ दूर सारल्याबद्दल अन् सत्याला जागल्या-बद्दल त्याला वाटला.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल ग्रंथालय विभाग.
वा. क्र. 92 दिनांक .......
विषय बा.वा. क्र. ..........
BVBK-0400012